<u>विशेष दिवाणी दावा क्रमांक ३२/२००७ मधील नि.क्र.२३१ वरील आदेश</u>

**CNR No.MHSN050014452007**

१. वादी यांनी प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.२ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर न घेतल्यामुळे झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.२ सौ. दिपा दिलीपराव शिंदे (गवळी) या दिनांक १८.०७.२०२२ रोजी कोल्हापूर येथे मयत झालेल्या आहेत. परंतु प्रतिवादीतर्फे त्या मयत असल्याची कोणतीही सुचना अथवा पुरसिस रेकॉर्डवर ठेवलेली नाही. त्यामुळे वादींना त्याची माहीती मिळाली नसल्यामुळे मयताचे वारस रेकॉर्डवर आणण्याबाबत पुर्तता करता आली नाही. प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अगोदरपासूनच दाव्याच्या कामी प्रतिवादी क्र.१अ व ३ म्हणून सामील आहेत. त्यामुळे त्यांना नव्याने सामील करण्याची आवश्यकता नाही. प्रतिवादी क्र.२ या मयत झाल्याने त्यांच्याविरुध्द दावा अबेट झालेला आहे. त्यामुळे तांत्रीक दृष्टया वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी अबेटमेंट सेट असाईड होणे आवश्यक आहे. करीता प्रतिवादी क्र.२ यांच्याविरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे. .

३. प्रस्तुत अर्जाला अनुषंगून प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादी व प्रतिवादी क्र.२ हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. प्रतिवादी क्र.२ मयत झाल्याचे समजले नाही असे चुकीचे कथन करुन अर्ज दिला आहे. वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेल्या विलंबाबाबत वादी यांनी सबळ कारण दिलेले नाही. करीता वादीचा अर्ज २०००/- रुपये खर्च बसवून नामंजूर करण्यात यावा.

४.		वादी यांनी प्रस्तुत दावा घोषणा व मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२ सौ. दिपा दिलीपराव शिंदे दिनांक १८.०७.२०२२ रोजी मरण पावलेल्या आहेत ही बाब नि.क्र.२२८ वर दाखल केलेल्या त्यांच्या मृत्यू दाखल्यावरुन दिसून येते. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी क्र.२ यांचे वारस सुरुवातीपासूनच दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१अ व प्रतिवादी क्र.३ म्हणून नमूद आहेत. परंतु दाव्यामध्ये तांत्रीक दोष राहु नये व दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्याकरीता प्रतिवादी क्र.२ यांच्या नावासमोर कंस मारुन त्यांच्या वारसांना दाव्यामध्ये सामील करणे व त्यांना पुराव्याची संधी देणे आवश्यक आहे. करीता प्रतिवादी क्र.२ यांच्याविरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**आदेश**

वादी यांचा नि.क्र.२३० वरील अबेटमेंट रद्द करणेचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MUKUL MADHUSUDAN CHITALE
Date: 2024.07.22 18:06:34 +0530

इस्लामपूर.		**(मुकुल म. चितळे)**
दिनांक १५.०७.२०२४		दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर.